**प्रेसनोट** ता. २४/१२/२०२२

**निर्घुण खुनाच्या गुन्ह्यातील फरार झालेल्या आरोपीना अवघ्या पाच तासांच्या आत मध्ये ताब्यात घेवुन केली अटक चिखली पो.ठाणे कडील तपास पथकाची कामगीरी**

---

फिर्यादी किशोर दत्तात्रय सोनवणे, वय १८ वर्ष, धंदा-काहीनाही, रा.संतोष जांभुळकर यांचेकडे भाडेकरू, जांभुळकर कमानीजवळ, जाधववाडी, चिखली, पुणे. मुळगांव- आपसी ता.तुळजापूर जिल्हा-उस्मानाबाद यांनी फिर्याद दिली की, “दि.२३/१२/२०२२ रोजी वेळ सायं ०६/४५ वाजण्याचे सुमारास ते त्यांचे मित्र सुरज उर्फ सोन्या संदिप शिंदे याचे सोबत जाधववाडीतील बैलगाडा शर्यत घाटात, महादेवाचे मंदिराजवळ गप्पा मारत बसलो असताना आदित्य पोटोळे याने जुन्या भांडणाचा राग मनात धरुन त्याचे इतर मित्र विशाल पवार, गणेश लोंढे व विधीसंघर्षित बालक याचेसह पालघन व तलवारीसारख्या लोखंडी पट्टीने जिवे ठार मारण्याचे उद्देशाने डोक्यात व संपुर्ण शरीरावर जाणीवपुर्वक मारुन त्याचा निर्घुण खुन करुन घटनास्थळावरुन फरार झालेबाबत तक्रार दिल्याने सदरबाबत चिखली पोलीस ठाणे गुन्हा क्र. ६९५/२०२२,भादंवि कलम,भा. दं. वि. कलम ३०२,३४ भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) प्रमाणे. गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्ह्यामधील **फरार आरोपी १) आदित्य पोटोळे २) विशाल पवार ३) गणेश लोंढे ४) विधीसंघर्षित बालक , सर्व रा. चिखली, पुणे** यांचा तात्काळ शोध घेणेकामी मा.वरिष्ठांचे सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे तपासपथकातील अधिकारी व अंमलदार हे घरकुल,चिखलीगाव,जाधववाडी,इंद्रायनी नदी काठी, मोईगाव परीसर, शोध घेत असताना तपास पथकातील **पोलीस नाईक /अमर कांबळे** यांना बातमी मिळाली की आरोपी १) आदित्य पोटोळे २) विशाल पवार ३) गणेश लोंढे ४) विधीसंघर्षित बालक हे **निघोजे** परिसरात लपलेले आहेत, परंतु निश्चित ठिकाण माहीत नसेलेने तात्काळ तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने निघोजे परिसरात तब्बल ३ तास शोध घेंवुन सदर आरोंपी हे बैलगाडा घाट निघोजे येथे अंधाराचा फायदा घेवुन पळु लागले असता तपासपथकातील अधिकारी सपोनि राकेश गुमाने व सर्व पोलिसांनी अंधारात पाठलाग करुन त्यांना ताब्यात घेतले असता त्यांनी गुन्हा केलेची कबुली दिली त्यामुळे सदर आरोपींना अटक केलेली आहे. निर्घुण प्रकारे खुन करुन समाजात दहशत पसरवणारे फरार आरोपींना चिखली पोलिस तपास पथकाने तात्काळ अटक केलेमुळे चिखली परिसरातील नागरिकांमध्ये चिखली पोलिसांचे कौतुक होत आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास चिखली पोलीस करित आहेत.

**सदरची कारवाई श्री.विनयकुमार चौबे,पोलीस आयुक्त सो. डॉ श्री.संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो. पिं.चिं. डॉ. श्री. काकासाहेब डोळे, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२, तसेच देहुरोड विभागाचे सहा. पोलीस आयुक्त श्री. पदमाकर घनवट, चिखली पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. वसंतराव बाबर, चिखली पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. राजेंद्र बर्गे, यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली चिखली पोलीस ठाणेचे तपास पथक अधिकारी श्री. राकेश गुमाने, सहा.पोलीस निरीक्षक, श्री. नकुल न्यामणे, सहा. पोलीस निरीक्षक, श्री. शाम मस्के, सहा. पोलीस निरीक्षक, श्री. अमरदिप पुजारी, पोलीस उपनिरीक्षक, विवेक कुमटकर, पोलीस उपनिरीक्षक, श्री. महेश मुळीक, पोलीस उपनिरीक्षक, श्री. संजय बारावकर, पोलीस उपनिरीक्षक व तपास पथकामधील अंमलदार सहा. पोलीस फौजदार एस. व्ही. कडलग, सहा. पोलीस फोजदार मोरे सहा फौजदार के एन वडेकर, पोलीस हवालदार/शिंदे, पोलीस हवालदार/सावंत,पो हवा/साकोरे, पो.हवा. नांगरे, पोहवा. गोडांबे, पोहवा. चोरघे, पोलीस नाईक/ सचिन गायकवाड,पोलीस नाईक/ संदिप राठोड, पोलीस नाईक/कबिर पिंजारी, पोलिस नाईक / दिपक मोंहिते, पोलिस नाईक / अमर कांबळे ,पोलिस नाईक/विश्वास नार्नेकर, पोलिस नाईक/ गणेश साबळे, पो. नाईक / सुरज सुतार, पोलीस कॉन्स्टेबल/अशोक आठरे, पोशि. बांगर होमगार्ड संकेत बहिरवडे तांत्रिक मदत पोलिस नाईक/ सागर पंडित (पो उपायुक्त कार्या. परिमंडळ २) या पथकाने केली आहे.**

( काकासाहेब डोळे )
पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-२
पिंपरी चिंचवड आयुक्तालय

Scanned with Oken Scanner